मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# एमआयडीसीला आता प्रक्रिया केलेले सांडपाणी

## स्वतंत्र जलवाहिनी टाकण्याचा निर्णय : महापालिका ठेवणार सॉफ्टवेअरद्वारे लक्ष

**पिंपरी | प्रतिनिधी**

उद्योगनगरी पिंपरी-चिंचवड शहरातील एमआयडीसीतील उद्योगांना प्रक्रिया केलेले सांडपाणी देण्यात येणार आहे. त्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा वापर कसा होतो, किती पाणी नदीत सोडले जाते, याची माहिती संकलित ठेवण्यासाठी महापालिकेने सॉफ्टवेअर तयार केले आहे.

शहराची लोकसंख्या दिवसेंदिवस वाढत असल्याने पाण्याची मागणीही वाढत आहे. शहरासाठी उपलब्ध होणारे पाणी भविष्यात पुरणार नाही. त्यामुळे पाण्याचे पर्यायी स्रोत निर्माण करण्यासाठी महापालिका प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. महापालिकेचे छोटे-मोठे २० सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) आहेत. त्यामध्ये दिवसाला ३०० दशलक्ष लिटर (एमएलडी) सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. यांपैकी केवळ २२ एमएलडी पाण्याचा वापर केला जातो. दहा एमएलडी पाणी दापोडीतील लष्करी अभियांत्रिकी महाविद्यालयाला (सीएमई) दिले जाते. तर, बारा एमएलडी पाणी उद्यान, बांधकाम, बागकाम, रस्तेसफाई, वाहने धुणे, अग्निशामक दलासाठी वापरले जाते. तसेच, काही गृहनिर्माण सोसायट्यांना टँकरद्वारे हे पाणी पुरवले जाते. उर्वरित प्रक्रिया केलेले पाणी नदीत सोडले जाते.



टाटा मोटर्स कंपनीने १.५ एमएलडी प्रक्रिया केलेले पाणी देण्याची मागणी केली आहे. प्रक्रिया केलेल्या पाण्याचा कसा वापर केला जातो, किती पाणी नदीत सोडले जाते, बांधकाम व्यावसायिकांना किती पाणी दिले जाते, याचा हिशेब ठेवण्यासाठी महापालिका संगणक प्रणाली विकसित करणार आहे. प्रक्रिया केलेले पाणी पिंपरी, चिंचवड, भोसरी, चाकण, तळवडे, हिंजवडी एमआयडीसीतील उद्योगांना दिले जाणार आहे. त्यासाठी स्वतंत्र जलवाहिनी टाकून पाणी देण्यात येणार आहे. त्याची देयके, नोंद ठेवण्यासाठी संगणक प्रणाली उपयुक्त आहे. त्याद्वारे कोणत्या संस्थेने किंवा व्यक्तीने किती पाणी वापरले याचा हिशेब, तसेच इतर माहिती उपलब्ध होणार आहे. त्यात क्यूआर कोडही असणार आहे.

### सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापरावर भर

» पिण्याव्यतिरिक्त इतर कारणांसाठी प्रक्रिया केलेले पाणी वापरल्यास पिण्याच्या पाण्याची मोठी बचत होते. महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाच्या निर्णयानुसार सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर करणे महापालिकेस बंधनकारक आहे. शासनाच्या 'स्वच्छ भारत अभियान', 'जल ही अमृत', 'माझी वसुंधरा' या अभियानात सांडपाणी पुनर्चक्रीकरण व पुनर्वापर धोरण महत्त्वाचे आहे. त्यासाठी या अभियानात गुण दिले जातात. महापालिका पवना धरणातून ५२०, आंद्रातून ८०, तर एमआयडीसीकडून २० असे एकूण ६२० एमएलडी पाणी एका दिवसात उचलते. त्यांपैकी २० सांडपाणी केंद्रांमार्फत केवळ ३०० एमएलडी सांडपाण्यावर प्रक्रिया केली जाते. सांडपाणी प्रक्रिया केंद्राची क्षमता वाढवावी, प्रक्रिया करण्यात येणाऱ्या पाण्याचे प्रमाण वाढवावे, असे आदेश राज्य सरकारने दिले आहेत.

> सांडपाण्याचा हिशेब ठेवण्यासाठी संगणक प्रणाली विकसित करण्यात येणार आहे. प्रक्रिया केलेले सांडपाणी जलवाहिनीद्वारे उद्योगांना देण्याचे नियोजन आहे.
>
> **- संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पिंपरी-चिंचवड महापालिका**

# सायबर चोरांचा नवा फंडा...! ई-चालानच्या नावाने आर्थिक फसवणूक

## पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी नागरिकांना खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक फसणूक करण्यासाठी सायबर चोरट्यांनी ई - चालानचा नवीन फंडा वापरण्यास सुरुवात केली आहे. सायबर चोरटे वाहतूक पोलिसांच्या नावाने नागरिकांच्या मोबाईलवर बनावट चालान पाठवत आहेत. विशेष म्हणजे हे फेक मेसेज इतके अधिकृत वाटतात की, सामान्य नागरिक सहज विश्वास ठेवत आहेत. या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड सायबर पोलिसांनी खबरदारी घेण्याचे आवाहन केले आहे.

संबंधित मेजेसला फसून नागरिक मेसेजमधील वेवसाईटवर जाऊन पैसे भरत आहेत. ही फसवणूक शहरातच नव्हे तर ग्रामीण भागातही झपाट्याने पसरत आहे. वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या वाहन चालकांच्या वाहनाच्या नावावर ऑनलाईन पद्धतीने ई-चालान टाकले जाते. गेल्या काही वर्षांपासून वाहतूक पोलीस ई-चालान पद्धतीनेच दंडाची आकारणी करत आहेत.



पोलिसांनी पाठविलेल्या अधिकृत मेसेजमध्ये हे चालान भरण्यासाठी एक लिंक दिलेली असते. त्यावर जाऊन नागरिक वाहनावर पडलेल्या दंडाचे चालान भरू शकतात. मात्र, सायबर चोरट्यांनी आता या ई चालानच्या माध्यमातून नागरिकांची फसवणूक करण्यास सुरुवात केली आहे. सुरुवातीला नागरिकांना त्यांच्या मोबाईलवर एक मेसेज येतो, "आपल्या गाडीने ट्रॅफिक नियमांचे उल्लंघन केल्यामुळे ५०० रुपये दंड आकारण्यात आला आहे. पुढील २४ तासांत दंड भरावा, अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल. पेमेंटसाठी खालील लिंकवर क्लिक करा." मेसेजमध्ये दिलेली लिंक अगदी अधिकृत सरकारी संकेतस्थळासारखी वाटते.

त्यामुळे आपल्या वाहनावरील दंड तपासण्यासाठी HTTPS://MAHATRAFFICECHALLAN.GOV.IN या अधिकृत वेबसाईटला भेट द्या. तेथे आपल्या गाडीचा नंबर टाकून दंडाची खरी माहिती तपासा. जर काही शंका असेल, तर थेट स्थानिक पोलीस स्टेशन किंवा वाहतूक शाखेशी संपर्क साधा.

> "चालकांना फसवण्यासाठी वाहतूक पोलिसांच्या नावाने बनावट ई-चालानचा मेसेज पाठवला जात आहे. मात्र, वाहतूक विभागाकडून केवळ अधिकृत वेबसाइटवरूनच चालानाची माहिती दिली जाते. कोणत्याही थर्ड पार्टी लिंकवरून, व्हाट्सअॅप किंवा एसएमएसद्वारे चालान पाठवत नाही. नागरिकांनी अशा मेसेजवर विश्वास ठेवू नये.
>
> **- रविकिरण नाळे ,वरिष्ठ निरीक्षक, सायबर पोलीस ठाणे**

# नगर रस्त्यावरील अर्धवट बीआरटी काढा : उपमुख्यमंत्री अजित पवार

## वाघोलीपर्यंतच्या दुमजली उड्डाणपुलाची व्याप्ती आता थेट विमाननगर चौकापर्यंत वाढवणार

**पुणे | प्रतिनिधी**

नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी अर्धवट अवस्थेत असलेली बीआरटी मार्गिका तातडीने काढून टाकण्याचे आदेश पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या (एनएचआय) माध्यमातून होणारा वाघोलीपर्यंतचा दुमजली उड्डाणपूल थेट विमाननगरपर्यंत करण्याचे निर्देशही पवार यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांना दिले.

वडगाव शेरी मतदार संघातील पाणी टंचाईचा प्रश्न आणि नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडी यासंदर्भात पालकमंत्री पवार यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेतली. या बैठकीला वडगाव शेरीचे माजी आमदार सुनील टिंगरे, महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, अतिरिक्त आयुक्त प्रदीप चंद्रन, नगर अभियंता प्रशांत वाघमारे, पाणीपुरवठा विभागाचे प्रमुख नंदकुमार जगताप, माजी नगरसेविका उषा कळमकर, नारायण गलांडे, ज्ञानेश्वर शिंदे, बाळाभाऊ पऱ्हाड, मनोज पाचपुते आदी पदाधिकारी उपस्थित होते.

बैठकीत माजी आमदार टिंगरे यांनी नगर रस्त्यावरील वाहतूक कोंडीचा गंभीर बनलेला प्रश्न आणि बीआरटी मार्गिकेत होणारे अपघात टाळण्यासाठी सोमनाथनगर चौक ते खराडी बायपास चौक या दरम्यानची अर्धवट बीआरटी मार्गिका काढण्याची मागणी पालकमंत्र्यांकडे केली. त्यावर पवार यांनी आयुक्तांना ही बीआरटी मार्गिका तत्काळ काढण्याचे निर्देश दिले. त्यावर आयुक्तांनी तातडीने कार्यवाही केली जाईल, असे स्पष्ट केले.




### हाउसिंग बोर्डाच्या पुनर्विकासासाठी तत्काळ परवानगी

» येरवडा येथील म्हाडा हाऊसिंग बोर्डाच्या पुर्नविकास योजनेचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महापालिकेकडून तत्काळ मिळाव्या, यासाठी हाउसिंग बोर्डाच्या शिष्टमंडळाने पवार यांची भेट घेतली. त्यावर पवार यांनी नगर अभियंता वाघमारे यांना पूर्णविकासासाठी आवश्यक परवानग्या देण्याच्या सूचना या बैठकीत दिल्या.

### महापालिकेच्या टँकरवर फ्री टँकरचा उल्लेख करा

» वडगाव शेरी मतदार संघातील वडगाव शेरी, गणेशनगर, सोमनाथनगर, खराडी, विमाननगर या भागात गेल्या काही दिवसांपूर्वी पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला होता. या भागात टँकर चालकानी नागरिकांना पाणीपुरवठा करताना वेठीस धरण्याची तक्रार बैठकीत करण्यात आली. त्यावर पवार यांनी महापालिकेकडून ज्या टँकरने पाणीपुरवठा केला जातो त्यावर विना शुल्क (फ्री) टँकर असा उल्लेख करा, असे निर्देश दिले. तसेच या भागातील पाणीपुरवठा तातडीने सुरळीत करा, असेही पवार यांनी सांगितले.

याचबरोबर नगर रस्त्यावर एनएचआयकडून शिरूर ते वाघोलीदरम्यान जो दुमजली उड्डाणपूल करण्यात येणार आहे, तो वाघोलीपर्यंत न करता तो थेट विमाननगरमधील फिनिक्स मॉलपर्यंत करण्यात यावा, असे थेट आदेश पवार यांनी राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सैनिक यांना थेट दूरध्वनीवरून दिले. या कामासाठी आवश्यक एनओसी महापालिकेने द्याव्यात अशा सूचनाही पवार यांनी यावेळी दिल्या.

येरवडा येथील म्हाडा हाऊसिंग बोर्डाच्या पुर्नविकास योजनेचे काम सुरू आहे. त्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महापालिकेकडून तत्काळ मिळाव्या, यासाठी हाउसिंग बोर्डाच्या शिष्टमंडळाने पवार यांची भेट घेतली. वडगाव शेरी मतदार संघातील वडगाव शेरी, गणेशनगर, सोमनाथनगर, खराडी, विमाननगर या भागात गेल्या काही दिवसांपूर्वी पाणीटंचाईचा प्रश्न निर्माण झाला होता. या भागात टँकर चालकानी नागरिकांना पाणीपुरवठा करताना वेठीस धरण्याची तक्रार बैठकीत करण्यात आली. अर्धवट अवस्थेत असलेली बीआरटी मार्गिका तातडीने काढून टाकण्याचे आदेश पालकमंत्री तथा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत.

# 'त्या' आदेशावर दोन महिन्यांत कार्यवाही; महापालिका आयुक्तांचा 32 गावांना दिलासा

## 32 गावांच्या कृती समिती सदस्यांची बैठक झाली, यामध्ये आयुक्तांकडून ही माहिती देण्यात आल्याचे कृती समिती सदस्यांनी सांगितले.

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मिळकतींना ग्रामपंचायत मिळकतकराच्या दुप्पट दराने कर आकारणी करण्याबाबत राज्य शासनाने दिलेल्या आदेशावर पुढील दोन महिन्यांत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले. आमदार विजय शिवतारे यांच्या प्रमुख उपस्थितीत ३२ गावांच्या कृती समिती सदस्यांची बैठक झाली. यामध्ये आयुक्तांकडून ही माहिती देण्यात आल्याचे कृती समिती सदस्यांनी सांगितले.

महापालिकेकडून समाविष्ट गावांत देण्यात येणाऱ्या सुविधांबाबत आमदार शिवतारे यांनी विधीमंडळ अधिवेनशात प्रश्न उपस्थित केले होते. यापार्श्वभूमीवर पालिकेत सदर बैठक झाली. आमदार शिवतारे यांनी तत्कालीन मुख्यमंत्र्यांनी गावांच्या कर आकारणी बाबत दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी आजपर्यंत का झाली नाही? असा सवाल केला. यावेळी महापालिका आयुक्त डॉ. भोसले म्हणाले की, शासनाच्या आदेशाची पुढील दोन महिन्यात अंमलबजावणी केली जाईल. त्याबाबतचे आदेश मिळकतकर विभागास दिले जातील. त्यानुसार, पुढील बीले नागरिकांना पाठविण्यात येतील. महापालिकेत समाविष्ट झालेल्या ३२ गावांमधील मिळकतींना ग्रामपंचायत मिळकतकराच्या दुप्पट दराने कर आकारणी करण्याबाबत राज्य शासनाने दिलेल्या आदेशावर पुढील दोन महिन्यांत योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले यांनी दिले.



### काय आहेत शासनाचे आदेश ?

» विधानसभा निवडणूकीपूर्वी राज्य शासनाने महापालिकेत समाविष्ट ३२ गावांच्या शास्तीकर वसूलीला स्थगिती दिली आहे. तसेच, महापालिकेने या गावांसाठी आकारण्यात येणारा मिळकतकर ग्रामपंचायतीच्या दुप्पट असू नये, असे आदेश दिले. मात्र, पालिकेकडून अद्यापही यावर कुठलीही कारवाई करण्यात आली नाही. शासनाने या बाबतचा प्रस्तावही पाठविण्याच्या सूचना केल्या होत्या. मात्र, महापालिकेने अद्यापही असा प्रस्ताव पाठविलेला नाही.

> पुढील दोन महिन्यांत कार्यवाही करण्याचे आश्वासन महापालिका आयुक्तांनी दिले. ग्रामपंचायतीच्या धरतीवर कराची आकारणी होऊन सुधारित नवीन बिले पुढील काही दिवसांमध्ये सर्वांना प्राप्त होतील. ३२ गाव कृती समितीच्या लढ्याला आलेले हे यश आहे.
>
> **- अविनाश लगड ( ३२ गावे कृती समिती सदस्य)**

# महापालिकेच्या पेपरलेस कारभाराला खो ; 112 कोटींचा खर्च करूनही संगणक प्रणाली स्लो

## महापालिकेतील कागदी घोडे बंद करून ई-ऑफिसच्या कामकाजास प्रत्यक्षात नवीन आर्थिक वर्षापासून सुरुवात झाली आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेत 2025 या नव्या वर्षात डिजिटल कारभार अर्थात ई-ऑफिस सुरू करण्याची चर्चा होती. अखेर महापालिकेतील कागदी घोडे बंद करून ई-ऑफिसच्या कामकाजास प्रत्यक्षात नवीन आर्थिक वर्षापासून मंगळवारी (दि. 1) सुरुवात झाली आहे. मात्र, एकाच वेळी सर्वच विभागांच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संगणक प्रणालीवर काम सुरू केल्याने सर्व्हर स्लो होऊन डाऊन झाले. फाईल अपलोड होत नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांना नाईलास्तव दिवसभर संगणकासमोर बसून राहण्याची वेळ आली.

**कागदपत्रे डिजिटल स्वरूपात जतन करण्यात येणार**

महापालिकेत प्रत्येक विभागात मोठ्या प्रमाणावर फाईल्सचा ढीग असते. शासनाच्या 100 दिवसांच्या उपक्रमामध्ये या फाईल्स तपासून त्यावर कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू आहे. यापुढे कागदपत्रे डिजिटल स्वरूपात जतन करण्यात येणार आहेत. पेपरलेस कारभार सुरू व्हावा, तसेच नवीन तंत्रज्ञानानुसार डिजिटल प्रणालीचा वापर करण्यासाठी ई-ऑफिस ही यंत्रणा तयार करण्यात आली आहे. त्यासाठी अधिकारी कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक त्या सर्व चाचण्या घेण्यात आल्या आहेत, तसेच विभागप्रमुख, वरिष्ठ अधिकारी, प्रशासन अधिकारी, शाखाप्रमुख, लिपिक यांना प्रशासकीय कामकाजासाठी डिजिटल कोड देण्यात आले आहेत. विभागप्रमुख तसेच, अधिकाऱ्यांच्या डिजिटल स्वाक्षरीही तयार करण्यात आल्या आहेत.

मार्चअखेर महापालिकेच्या सर्व विभागातील हाताने कागदावर होणारे कामकाज बंद करण्यात आले. एकाही कागदाची प्रिन्ट काढली जाणार नाही. एक एप्रिल 2025 पासून ई-ऑफिस प्रणाली पूर्ण क्षमतेने सुरू करण्याचे आदेश महापालिका आयुक्तांनी सर्व विभागप्रमुखांना दिले आहेत. त्यानुसार, प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू करण्यात आली आहे. तसेच, ही पद्धत अवलंबविणारी ही राज्यातील पहिलीच महापालिका असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.



### मोठ्या संख्येने फाईल अपलोड झाल्याने सर्व्हर संथ

» पहिल्या दिवशी सर्वच विभागांच्या कर्मचाऱ्यांनी अधिक क्षमतेच्या फाईली अपलोड केल्या. एकाच वेळी अधिक जणांनी असे केल्याने सर्व्हर डाऊन झाला आहे. त्यामुळे कामकाज संथ झाले आहे. त्यात एक-दोन दिवसांत सुधारणा होईल, असे महापालिकेच्या सामान्य प्रशासन विभागाचे उपायुक्त विठ्ठल जोशी यांनी सांगितले.

### 33 संगणक प्रणाली केल्या विकसित

» पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडने जीआयएस एनेबल ईआरपी प्रकल्पाअंतर्गत 33 संगणक प्रणाली विकसित केल्या आहेत. प्रकल्पात मोठ्या प्रमाणात माहितीचे संकलन करण्यात आले आहे. महापालिकेच्या 1 हजारपेक्षा अधिक प्रक्रियांवर बिझनेस प्रोसेस रि-इंजिनिअरींग करण्यात आले आहे. ई-ऑफिस कामकाजामुळे पेपरलेस कामकाज होऊन प्रशासकीय कामकाज सुलभ असा दावा प्रशासनाने केला आहे. या कामासाठी तब्बल 112 कोटी रुपयांचा खर्च करण्यात आला आहे. असे असूनही ई-ऑफिस कामकाज सुरू झाल्यानंतर ते ठप्प झाल्याचा अनुभव अधिकारी व कर्मचाऱ्यांना येत आहे.

### महापालिकेचे नवीन तंत्रज्ञानाकडे नवीन पाऊल

» महापालिकेच्या सर्व विभागात 1 एप्रिलपासून ई-ऑफिस प्रणालीनुसार डिजिटल कामकाज सुरू करण्यात आले आहे. त्यानुसार, सर्व विभागांचे कामकाज सुरू झाले आहे. त्याला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा चांगला प्रतिसाद आहे. आर्थिक, प्रशासकीय आणि दैनंदिन कामांबाबतचा कारभार डिजिटल सुरू झाला असून, फायली हाताळणे बंद केली आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेने नवीन तंत्रज्ञानाकडे टाकलेले हे एक महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, असे महापालिकेचे आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी सांगितले.

# स्वतंत्र मनुष्यबळ असूनही कोंडी सुटेना; अरुंद रस्त्यामुळे वाहतूक कोंडीत भर

## अद्याप कामाचे स्वरूपच ठरवण्यात आलेले नसल्याने वाहतूक कोंडीचे आव्हान हे अधिकार कसे पेलणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील रस्ते प्रशस्त आहेत. शहरात उड्डाणपूल, ग्रेडसेपरेटर, भूयारी मार्ग असताना ही शहरातील २५ मुख्य चौकात वाहतूक कोंडी दररोज होत आहे. त्याशिवाय शहराच्या पदपथ, सायकल ट्रॅकवरदेखील वाहनांचे पार्किंग होत असल्याने अनेक ठिकाणी रस्ते अरुंद होत असून त्या भागात देखील वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. पालिकेच्या दळणवळण विभागाच्या अधिकाऱ्यांना नियुक्त्या दिया गेल्या आहेत, मात्र अद्याप कामाचे स्वरूपच ठरवण्यात आलेले नसल्याने वाहतूक कोंडीचे आव्हान हे अधिकार कसे पेलणार असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

वाहतूक कोंडीवर कायमस्वरुपी तोडगा काढण्यासाठी महापालिकेने शहरी दळण-वळण विभाग तयार करत १३ उच्चपदस्थ अधिकाऱ्यांना पदोन्नती देत त्यांची नियुक्ती केली. पण, सदरील विभागाच्या कामकाजाचे धोरण अद्यापही निश्चित करण्यात आलेले नाही. पुढे काय काम करायचे आहे, हेच ठरलेले नाही. तरीही अधिकाऱ्यांना पदोन्नती देण्याचा प्रकार महापालिका सामान्य प्रशासनाकडून केला आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची लोकसंख्या ३० लाखांच्या आसपास आहे. तसेच शहरात वाहनाची संख्याही दुप्पट झाली आहे. शहरातील प्रशस्त रस्ते, उड्डाणपुल, भूयारी मार्ग, सिग्नल फ्री रस्त्यावरही वाहतूक कोंडी होत असल्याचे दिसून येत आहे.

अनेकदा वर्दळीच्या वेळेत सकाळी व सायंकाळी मुख्य, तसेच अंतर्गत रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागत आहेत. 'अर्बन स्ट्रीट डिझाइन'ने पदपथ व सायकल ट्रॅक तयार केल्याने त्यात रस्ते अरुंद झाले आल्याने कोंडीत आणखी भर पडत आहे.



### विभाग बदलला पण प्रश्न कायम

» शहरातील प्रशस्त रस्ते आणि उड्डाणपूलावर वारंवार वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत असल्याने नागरिक, वाहनचालक त्रस्त आहेत. त्या समस्येवर तोडगा काढण्यासाठी महापालिकेने शहरी दळण-वळण विभाग नव्याने सुरू केला आहे. त्यासाठी १३ अधिकारी-कर्मचाऱ्यांची नियुक्ती तयार केली आहे. शहराचे संपूर्ण वाहतूक नियोजन सांभाळण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली. मात्र, त्या विभागासाठी स्वतंत्र असे धोरण निश्चित न झाल्याने हा विभाग ठोस असे काम करीत नसल्याचे दिसून येत आहे.

> “ राज्यातील मोठ्या शहरांतील महापालिकांमध्ये शहरी दळणवळण स्वतंत्र विभाग आहेत. त्यानुसार महापालिकेने शहरी दळणवळण विभाग सुरू करून अधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या आहेत. त्या विभागाची जबाबदारी निश्चित करण्याचे काम सुरू आहे. लवकरच ते धोरण जाहीर केले जाईल.
>
> - विठ्ठल जोशी, उपायुक्त, सामान्य प्रशासन विभाग

# वाघोली पोलीस ठाणे वादाच्या भोवऱ्यात

## वाघोली पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे नागरिकांशी वर्तन सुधारत नसल्याने कर्मचाऱ्यांवर कारवाईची नागरिकांची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलीस आयुक्तालय अंतर्गत नव्याने स्थापन झालेल्या वाघोली पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे नागरिकांशी वर्तन सुधारत नसल्याने वाघोली पोलीस ठाणे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. वादग्रस्त कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

तक्रार देण्यासाठी आलेल्या सर्वसामान्य नागरिकांना अपमानास्पद वागणूक दिल्याचा प्रकार (दि. 2) उघड झाला आहे. या प्रकरणातील ठाणे अंमलदार याने अपघात ग्रस्त नागरिकाची तक्रार न घेता त्याला खडे बोल सुनावले होते. हा प्रकार उघडकीस आल्यानंतर या कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी नागरिकांकडून जोर धरू लागली आहे. वाघोली पोलीस ठाण्यात नागरिकांना मदत होईल या अपेक्षेने येणाऱ्या नागरिकांना अपमानास्पद वागणूक मिळत असल्याने पोलीस प्रशासनावर नागरिकांची नाराजी वाढू लागली आहे.




### जमीन, जागांचे ताबा घेणारे स्पेशलिस्ट

» वाघोली आणि लोणीकंद पोलीस ठाण्याच्या परिसरात असणाऱ्या जागा जमिनी व इतर बांधकाम क्षेत्राशी निगडित व्यवसाय यांच्या बाबतीत ताबा घेऊन देणे, थांबवणे या प्रकरणात वाघोली आणि लोणीकंद पोलीस ठाण्यात काही स्पेशलिस्ट कर्मचारी आहेत. या वादग्रस्त स्पेशलिस्ट कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालय मुख्यालयाचा रस्ता दाखवण्याची वेळ आली आहे.

वरिष्ठ पोलीस निरीक्षकांनी याप्रकरणी लक्ष दिल्यानंतर संबंधित नागरिकांची दुसऱ्या दिवशी तक्रार घेण्यात आली आहे. सर्वसामान्य नागरिकांना दहशतीखाली ठेवून दमबाजी करणाऱ्या ठाणे अंमलदारांची नेमणूक चालू असलेल्या अवैध धंदे चालकांवर कारवाई करण्यासाठी करावी अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. सध्या तरी नव्याने नेमणूक झालेल्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना नागरिकांना पोलिसांची मदत व्हावी यासाठी वादग्रस्त कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा बडगा उगारावा लागेल हे चिन्ह निर्माण झाले आहे.

### आयुक्तांकडून दखल घेतली जाते

» पुणे पोलीस आयुक्तांकडे नागरिकांच्या आलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने तातडीने योग्य तो न्याय व दखल घेतल्याचा अनुभव नागरिकांना आला आहे. वाघोली व लोणीकंद पोलीस ठाण्यातील काही वादग्रस्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आयुक्तांनी यापूर्वी देखील खडे बोल सुनावले होते. अधिकाऱ्यांच्या बदल्या मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत; मात्र वादग्रस्त पोलिसांच्या बदल्या होत नसल्याने नागरिकांना त्रास होत आहे.

वाघोली व लोणीकंद पोलीस ठाण्यातील काही वादग्रस्त कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आयुक्तांनी यापूर्वी देखील खडे बोल सुनावले होते. अधिकाऱ्यांच्या बदल्या मोठ्या प्रमाणात झाल्या आहेत; मात्र वादग्रस्त पोलिसांच्या बदल्या होत नसल्याने नागरिकांना त्रास होत आहे. जागा जमिनी व इतर बांधकाम क्षेत्राशी निगडित व्यवसाय यांच्या बाबतीत ताबा घेऊन देणे, थांबवणे या प्रकरणात वाघोली आणि लोणीकंद पोलीस ठाण्यात काही स्पेशलिस्ट कर्मचारी आहेत. या वादग्रस्त स्पेशलिस्ट कर्मचाऱ्यांना पोलीस आयुक्तालय मुख्यालयाचा रस्ता दाखवण्याची वेळ आली आहे.

वाघोली पोलीस ठाण्यातील कर्मचाऱ्यांचे नागरिकांशी वर्तन सुधारत नसल्याने वाघोली पोलीस ठाणे वादाच्या भोवऱ्यात अडकले आहे. वादग्रस्त कर्मचाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून केली जात आहे

# लोणी काळभोरसह जिल्ह्यात 10 ठिकाणी होणार अग्निशमन केंद्र

## आग लागून होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने लोणी काळभोर, केडगावसह जिल्ह्यात 10 ठिकाणी अग्निशमन केंद्र मंजूर केले

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून अर्थात पीएमआरडीए कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांच्या सुरक्षिततेसाठी दहा ठिकाणी अग्निशामक केंद्र बांधण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.

या प्रस्तावाला जिल्ह्याधिकाऱ्यांनी अंतिम मंजूरी दिल्यानंतर पुणे जिल्ह्यात १० ठिकाणी अग्निशामक केंद्र उभी राहणार आहेत. जिल्ह्यातील हवेली, शिक्रापूर, दौंड, मावळ, पुरंदर, मुळशी, खेड तालुक्यांतील गावांचा समावेश आहे. त्यानुसार लोणी काळभोर, केडगावसह 10 ठिकाणी अग्निशामक केंद्र उभे राहणार आहेत. त्यासाठीच्या नव्या जागांची निश्चिती देखील करण्यात आली आहे.

पूर्व हवेलीत शहरीकरण, नागरीकरण व औद्योगिकीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे आगीच्या छोट्या-मोठ्या घटना वारंवार घडत आहेत. हडपसर आणि वाघोली येथील अग्निशमन दलाची गाडी येईपर्यंत नागरिकांचे मोठे नुकसान होते. यामुळे पूर्व हवेलीत आग लागून होणारे नुकसान टाळण्यासाठी प्रशासनाने लोणी काळभोर, केडगावसह जिल्ह्यात 10 ठिकाणी अग्निशमन केंद्र मंजूर केले आहेत.



### येथे होणार केंद्र

» अग्निशमन दलाची केंद्रे हवेली तालुक्यातील लोणी काळभोर, वडाचीवाडी, औताडे हांडेवाडी, शिरूर तालुक्यातील शिक्रापूर, दौंड तालुक्यातील केडगाव, मावळ तालुक्यातील कान्हे, पाटण, पुरंदर मधील दिवे, मुळशीतील महाळुंगे व खेड तालुक्यातील येलवाडी येथे होणार आहेत.

पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) कार्यक्षेत्रात येणाऱ्या गावांच्या सुरक्षिततेसाठी दहा ठिकाणी अग्निशमन केंद्र बनवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला प्रशासकीय मंजुरीही मिळाली आहे. या केंद्रांसाठी जागा निश्चित होत नव्हत्या; मात्र आता जागा निश्चितीचे काम आता शेवटच्या टप्प्यात आहे. जागा निश्चितीसाठी 'पीएमआरडीए'कडून जिल्हाधिकाऱ्यांना प्रस्ताव दिला आहे.

दौंड, खेड, मुळशी, शिरूर आणि पुरंदर तालुक्यातील प्रत्येकी एका गावाचा समावेश आहे. तर सर्वाधिक जास्त केंद्रे हे हवेलीमध्ये तीन आणि मावळ तालुक्यात दोन होणार आहेत. 'पीएमआरडीए'च्या हद्दीमध्ये 814 गावांचा समावेश आहे. औद्योगिक वसाहती, त्यामुळे वाढत्या नागरीकीकरणामुळे अग्निशमन केंद्रांची अत्यंत आवश्यकता होती. सध्या जिल्हाधिकाऱ्यांना जागेसाठी प्रस्ताव पाठविला आहे.

जिल्हाधिकाऱ्यांकडून हिरवा कंदील मिळाल्यानंतर तातडीने केंद्रांच्या कामाला सुरुवात होणार आहे. या कामांसाठी दीडशे कोटींच्या प्रकल्पाला मंजुरी देण्यात आली आहे. पूर्व हवेलीत शहरीकरण, नागरीकरण व औद्योगिकीकरणाचा वेग मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्यामुळे जिल्ह्यात एखादी मोठी दुर्घटना घडली, तर पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधून अग्निशामक विभागाच्या गाड्या बोलवाव्या लागतात. त्यासाठी ग्रामीण भागात जागा निश्चित करून त्या मिळवण्यासाठी 'पीएमआरडीए'चे प्रयत्न सुरू आहेत.